**प्रेस नोट** दिनांक ०६/०९/२०२२

**उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती क्र. ४ कार्यालय -जि. ठाणे, येथील सहाय्यक आयुक्त, मजुर (मुकादम -अतिरिक्त कार्यभार) व सफाई कामगार यांस लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | गु.नों.क्र. ०४५-१७.५६ वा. हिललाईन पोलीस स्टेशन,ठाणे शहर जि. ठाणे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन २०१८) अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१)महेंद्र पंजाबी,वय ५०, पद -सहाय्यक आयुक्त, वर्ग - २,**<br>**२) रतन शंकर जाधव, वय ५०, पद- मजुर, मुकादम-अतिरिक्त कार्यभार, वर्ग- ४,**<br>**३) विजय राधाकिसन तेजी, वय ४६, पद- सफाई कामगार, वर्ग- ४, सर्व नेमणूक -प्रभाग समिती क्र. ४, उल्हासनगर महानगरपालिका** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती २५,०००/-रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदारयांनी दि. ११/०८/२०२२ रोजीदिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांच्या मोडकळीस आलेल्या रुमचे नव्याने करत असलेल्या बांधकामास परवानगी देण्यासाठी तसेच सदर बांधकामावर कारवाई न करण्यासाठी दि. ११/०८/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान लोकसेवक नं. २रतन जाधव, यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी लोकसेवक नं.१ महेंद्र पंजाबी,सहाय्यक आयुक्त, यांचेकरीता ३०,०००/- रू. लाचेच्या रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती २५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>पडताळणीचे अनुषंगाने आज दि. ०६/९/२०२२ रोजी अेसीबी ठाणे युनिटने सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक नं. २ रतन जाधव यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम लोकसेवक नं. ३ विजय तेजी यांचेकडे देण्यास सांगितले त्याप्रमाणे लोकसेवक नं. ३ विजय तेजी यांनी तक्रारदार यांचेकडून सहाय्यक आयुक्त महेंद्र पंजाबी यांच्याकरीता २५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लोकसेवक, **२) रतन शंकर जाधव, पद- मजुर, मुकादम-अतिरिक्त कार्यभार, वर्ग- ४, ३) विजय राधाकिसन तेजी, पद- सफाई कामगार, वर्ग- ४,**यांना रंगेहात पकडण्यात आले. तसेच यातील लोकसेवक १) **महेंद्र एम. पंजाबी, पद - सहाय्यक आयुक्त, वर्ग - २, प्रभाग समिती क्र. ४, उल्हासनगर महानगरपालिका**यांचा शोध घेत आहोत. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :-**ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेतस्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :-spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :-acbmaharashtra.net
टोल फ्री नं :-१०६४
दुरध्वनी क्र. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस् ॲप क्र. :-९९३०९९७७००

(जगदीश गावीत)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे